# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे एक शिकवण

पुन्हा प्राप्त करणे, पुन्हा नामकरण करणे, पुन्हा रचना करणे . . .

वेदान्तामध्ये एका महिलेविषयी एक सुपरिचित कथा आहे, ज्यामध्ये ती महिला आपला कंठहार हरवलेला आहे अशा समजूतीने त्याचा शोध चहूदिशांना, वरखाली, दूरवर सर्वत्र घेत राहते. ती खूप वेळ शोधाशोध करते, पण खरेतर तो हार कधी हरवलेलाच नसतो! संपूर्ण वेळ तो हार तिच्या गळ्यातच असतो.

त्याचप्रमाणे परम आत्मा कधीही हरवत नाही, तरीदेखील एक साधक आपल्या विश्वाच्या कान्याकोपऱ्यात त्याला शोधत राहतो, शोधत राहतो आणि *शोधतच* राहतो. असे प्रतीत होते की, माया ही अभेद्य आहे. हे म्हणजे जणू काही पूर्णपणे बंद असलेल्या अशा एखाद्या गडद अंधाऱ्या इमारतीत अडकून पडणे आहे की, जिथून बाहेर पडण्यासाठी कोणताच दरवाजा दिसत नाही—स्वतःहून उत्पन्न केलेल्या दुःख-क्लेशातून, स्वतःला बद्ध ठेवण्याचा जो करार तुम्ही स्वतःशी केलेला आहे, त्यातून सुटण्याचा कोणताही मार्ग उपलब्ध नाही. वेदान्तात आणखी एक कथा आहे जी या दुर्दशेचे चित्रण करते. या कथेमध्ये एक अंध मनुष्य एका खोलीत अडकून पडलेला असतो आणि खोलीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असतो. पण जेव्हाजेव्हा तो दारापाशी येतो, तेव्हातेव्हा अचानक त्याला खाज सुटते व त्याचे लक्ष विचलित होते आणि मुक्त होण्याची संधी तो गमावून बसतो.

साधनेतदेखील असेच घडते. जीवनातदेखील असेच घडते. लोकांच्या मनातील दडलेल्या शंका, त्यांनी रचलेल्या कहाण्या, सामान्यत्वाच्या बेड्यांमध्ये जखडलेले राहण्यासाठी त्यांनी पुढे केलेल्या सबबी, 'हे माझ्याच्याने होणार नाही' असा त्यांचा दृढमूल विश्वास, इंद्रियांना संतुष्ट करण्याची इच्छा—या सर्व तथाकथित सीमितता त्यांच्यासाठी वास्तव होतात. त्या प्रगतीला खीळ घालतात. प्रकाश जर चमकायचा असेल, तर *काहीतरी* बदलायलाच हवे.

निसर्गामध्ये पुनरुद्धाराची प्रक्रिया अव्याहतपणे चालूच असते. मनुष्यजातीने या ग्रहाची जमीन आणि त्याचे पाणी यांचा ताबा घेण्यासाठी जे-जे काही केले आहे, तथापि पृथ्वीने वारंवार या गोष्टीची साक्ष दिली आहे की, जे काही तिचे आहे ते सर्व ती पुन्हा प्राप्त करेलच. पृथ्वीला स्मरणशक्ती आहे, मग तिच्या नोंदी कितीही अस्पष्ट का असेनात, तिचा इतिहास कितीही प्राचीन का असेना. अगदी त्याच प्रकारे साधकांसाठीदेखील हे अगदी स्वाभाविक आहे की, त्यांनी आपली जन्मजात समृद्धी पुन्हा एकदा

प्राप्त करण्याची आकांक्षा बाळगावी; ते या दृढ विश्वासाने प्रेरित असतात की, ब्रह्म त्यांच्या अंतरी विद्यमान आहे, आत्मप्रकाश हा त्यांचाच आहे.

बरेचदा तुम्ही एखाद्या गोष्टीला *एक नवे नाव देऊन* ती पुन्हा प्राप्त करू शकता. यामुळे तुम्ही नव्या नेत्रांनी, नूतन दृष्टिकोणासह ते पाहू शकता, जे तुमच्यापाशी सदैव होते. मला आठवते, वर्ष १९७८मध्ये श्रीगुरुदेव आश्रमाला 'गुरुदेव सिद्धपीठ' असे नाव देण्यात आले होते. सुरुवातीला आम्हाला असंख्य प्रश्न पडले; आश्रमाचे नाव कशासाठी बदलले आहे हा विषय गोंधळात टाकणारा होता. पण 'गुरुदेव सिद्धपीठ' याचा खरा अर्थ काय आहे हे जेव्हा आम्हाला उमजू लागले, तेव्हा ते नावच एक जागृती बनले. आश्रम काय आहे, ही पवित्र भूमी काय होती आणि काय आहे याविषयीची सखोल समज आम्हाला प्राप्त झाली. आम्ही ज्या स्थानी आहोत त्या स्थानाचे मूल्य आम्ही अधिकच जाणू लागलो. हे *सिद्धपीठ* आहे, एक असे स्थळ की, ज्याने सर्व सिद्धांची शक्ती, आपले श्रीगुरु बाबा मुक्तानंदांची शक्ती धारण केली आहे, या विचाराने आम्ही आश्चर्याने भारावून गेलो.

जेव्हा एखादी गोष्ट अतिपरिचयाची होते, तेव्हा सहजपणे तिला कमी लेखले जाते, तिचे मूल्य दृष्टिआड केले जाते. म्हणूनच देवांची अनेक नावे उपलब्ध असणे हे आपल्यासाठी लाभदायक आहे. असंख्य परंपरांमधील महान विभूतींना देवत्वाच्या ज्या अनुभूती आल्या त्यांतून ही नावे व्युत्पन्न झाली आहेत. निरनिराळ्या लोकांना विविध नावांनी परमेश्वराला आळवणे आवडते. इतकेच नव्हे तर, असेही घडते की, एकच साधक त्याच्या आयुष्यातील निरनिराळ्या वळणांवर निरनिराळ्या नावांनी भगवंताला संबोधण्याकडे आकृष्ट होतो.

नवे नाव देण्याच्या या कृतीत निमग्न होणे हे अतिशय लाभदायी ठरू शकते. असे केल्याने तुम्ही स्वतःच्या सारतत्त्वाकडे परतण्याविषयी उत्सुक व जागरूक राहता तसेच प्रयत्नशीलही राहता. ही कृती त्या गोष्टीला एक प्रकारचा तजेला आणते, जी तुम्हाला सदासर्वदा प्राप्तच आहे. हा खजिना जो तुम्ही दीर्घ काळ जतन करून ठेवला आहे, त्याचे मूल्य तुमच्या लेखी वाढते. तुमच्या मते त्याची उपयोगिता आणखीनच वृद्धिंगत होते आणि त्याच्याविषयी उच्च आदरभाव बाळगणे अधिक सहजसुलभ होते.

आता, हे सर्व केल्यानंतर आणि इतके परिश्रम घेतल्यानंतर तुम्हाला तुमच्या आत्म्याविषयी नव्याने जी समज प्राप्त झाली आहे, ती तुम्ही शब्दात कशी व्यक्त कराल? त्याच्या वैभवशाली पावित्र्याच्या तुमच्या अनुभवाचे वर्णन तुम्ही कशा प्रकारे कराल? याचा अर्थ असा नव्हे की, जे शब्द आधीपासूनच अस्तित्वात आहेत त्यांचे असामान्य अर्थ नाहीत, किंवा त्यांचे सामर्थ्यशाली सूचित अर्थ आणि निगडित अर्थ नाहीत. होय, तुमच्यापाशी सुरेख आणि व्यापक शब्दभांडार आहे. तथापि, जे तुम्हाला दीर्घ

काळापासून ज्ञात आहे, त्याच्याशी तुमचे जे हे नवीन नाते अंकुरित होते आहे, त्याचे वर्णन करण्यासाठी—सदासर्वदा जे तुमच्याच समक्ष उपस्थित आहे, त्याविषयी तुम्हाला आता जी विशेष आत्मीयता आणि घनिष्ठता वाटते आहे, त्याचे वर्णन करण्यासाठी योग्य शब्द सापडणे ही संपूर्णतः निराळी बाब आहे.

तुम्ही कोणते शब्द वापराल? तुमच्या लेखणीतून कोणत्या प्रतिमा उतरतील? तुमच्या वर्णनात तुम्ही वस्तुस्थितीचे अचूक वर्णन व बारीकसारीक तपशील कसे व्यक्त कराल? आणि मग, जे तुम्ही शिकला आहात त्याविषयी तुम्ही काय कराल? तुमच्यातील दिव्यत्व आपला मंत्रमुग्ध करणारा प्रकाश प्रसरित करते आहे असे जेव्हा तुमच्या लक्षात येईल, तेव्हा तुम्ही कशा प्रकारे तुमच्या अंतरीच्या टिकाकाराला दूर सारून निर्भय राहाल? तुमच्या आत्म्याच्या अभिनव अनुभूतीच्या उदात्ततेचे महिमागान तुम्ही कशा प्रकारे कराल आणि कशा प्रकारे करत राहाल?

~ गुरुमाई चिद्विलासानंद

© २०२४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.